# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक १८/०७/२०२२ (सोमवार)**

**(सायंकाळ)**

---

### उपविभाग उमरेड हद्दीमधील बेसुर गावाजवळील चिखलापार नदिच्या पुलावर पुराच्या पाण्यात अडकलेल्या लोकांना वाचविण्यात पोलिसांना यश

दिनांक १८/०७/२०२२ रोजी पहाटे ०२.१० वा. दरम्यान अब्दुल नईन अब्दुल हनिफ रा. हिंगणघाट यांनी डायल ११२ वर कॉल करुन सांगितले की, ते त्यांच्या परिवारातील महिला व पुरुष असे एकुण १० लोक मिळुन दोन चार चाकी वाहनाने ब्रम्हपुरी ते हिंगणघाट जात होते. त्यादरम्यान उपविभाग उमरेड हद्दीमधील बेसुर गावाजवळील चिखलापार नदिच्या पुलावर पुराच्या पाण्यात अडकले असुन त्यांच्या दोन्ही बाजुनी पाणी वाहत असल्याचे कॉल करुन सांगितले. अश्या मिळलेल्या माहिती वरून तात्काळ डायल ११२ चे वाहनावर कर्तव्यावर हजर असलेल्या पोलिस नाईक पंकज बट्टे व नितेश राठोड यांनी सदर घटनेचे गांभीर्य जाणुन सदरचे घटनेची माहिती त्वरित नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक मा. श्री. विजयकुमार मगर यांना माहिती दिली असता मा. पोलिस अधिक्षक यांनी विभागीय गस्तवर असलेले सपोनि शरद भस्मे पो. स्टे. भिवापुर यांना घटनास्थळी जाण्याचे आदेश दिले असता सपोनि शरद भस्मे व बेसुर गावातील काही जागृत नागरीकांना, इतर पोलिस स्टाफला देउन ०२.२४ वा. घटनास्थळी दाखल झाले. सदरचे घटनास्थळावर १० लोक हे चिखलापार नदि व त्याच्या बाजुला असलेल्या नाल्याच्या मधोमध पुराच्या पाण्यात अडकल्याचे दिसुन आले. पोलिस स्टेशन उमरेड व भिवापुर येथील पोलिस स्टाफ तसेच बेसुर गावातील नागरीक जितेंद्र धोटे, विशाल चौधरी, अंकित कुंबळे, खोंडेशवर शिंगाडे, निरंजन डंभारे, आकाश कुबळे, सुरज अंबलकार, विशाल सेलोरे, अशोक जांभुळे, प्रकाश व्यापारी, सत्यवान पेलणे यांच्या मदतीने एकीकडे पडनारा सतत मुसळधार पाऊस व चिखलापार नदीचे पुराच्या पाण्याचा वाहनारा जोरदार प्रवाह अश्या अत्यंत भयंकर व जिवघेण्या परीस्थितीत आपल्या स्वत:च्या जिवाची पर्वा न करता तब्बल २ तास रेस्क्यु आपरेशन राबवित दोर व मानवी संकल तयार करून नदिचे पुराच्या पाण्यात अडकलेल्या १० लोकांना पहाटे ०४.४५ वा. दरम्यान सुखरूप रित्या बाहेर काढण्यात आले.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक राहुल माकणिकर, उपविभागीय पोलिस अधिकारी उमरेड विभाग उमरेड श्री. भिमराव टेळे यांचे मार्गदर्शनात भिवापुर येथील रात्र गस्तचे अधिकारी सपोनी भस्मे व पो.स्टे. भिवापुर येथील पोहवा रविन्द्र लेंडे, पोलिस नाईक दिपक जाधव, पो.स्टे. उमरेड येथील पोलिस नाईक नितेश राठोड, पोलिस नाईक पंकज बट्टे, पोलिस शिपाई उमेश बानटेर व स्थानिक नागरिक यांचे मदतीने पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर